150

अति.महा.आयुक्त (ज) कार्यालय,

आस्थापना विभाग, पुणे मनपा.

जा.क्र. :- अतिमआ/साप्रवि/आस्था/ 2909

दिनांक :- 11/06/2021

-: कार्यालयीन आदेश :-

विषय :- कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजनेसाठी नेमणूक केलेल्या अधिकारी / कर्मचारी यांचे कामकाजाबाबत.

संदर्भ :- १) साथरोग अधिनियम १८९७ ची अंमलबजावणी सुरु झाल्याबाबतची अधिसूचना दि.१३.०३.२०२०.
२) महाराष्ट्र कोविड १९ उपाययोजना नियम,२०२०.
३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५

पुणे शहरामध्ये कोरोना विषाणूचा प्रसार होऊ नये यासाठी कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी खालील तक्त्यात नमूद केलेल्या आदेशानुसार पुणे महानगरपालिका प्रशासनाकडून अधिकारी / कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | कामकाजाचे ठिकाण | आदेश क्रमांक व दिनांक |
|---|---|---|
| १ | परिमंडळ क्र.१ ते ५ | जा.क्र.अतिमआ/साप्रवि/आस्था/९८२५, दि.२३.०३.२०२० |
| २ | परिमंडळ क्र.१ ते ५ | जा.क्र.अतिमआ/साप्रवि/आस्था/९८२८, दि.२३.०३.२०२० |
| ३ | वैद्यकीय सर्वेक्षण | जा.क्र.अतिमआ/साप्रवि/आस्था/९८२४, दि.२३.०३.२०२० |
| ४ | नागरी सुविधा केंद्र | जा.क्र.अतिमआ/साप्रवि/आस्था/६४०, दि.०७.०५.२०२० |
| ५ | नागरी सुविधा केंद्र | जा.क्र.अतिमआ/साप्रवि/आस्था/१२९२, दि.०२.०६.२०२० |
| ६ | परिमंडळ क्र.१ ते ५ | जा.क्र.अतिमआ/साप्रवि/आस्था/९८८९, दि.२७.०३.२०२० |
| ७ | परिमंडळ क्र.१ ते ५ | जा.क्र.अतिमआ/साप्रवि/आस्था/८९११, दि.०९.०३.२०२१ |

उपरोक्त आदेशान्वये व तद्नंतर वेगवेगळया आदेशान्वये पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील अधिकारी/कर्मचारी यांना उप आयुक्त, परिमंडळ यांचेकडे उपलब्ध करून देण्यात आले आहे.

उपरोक्त आदेशान्वये कामकाजास असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजनेच्या कामकाजातून या आदेशान्वये कार्यमुक्त करण्यात येत आहे.

अधिकारी/कर्मचारी यांची आवश्यकता भासल्यास संबंधित अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयाकडील अधिकारी/कर्मचारी यांचेमधून मनुष्यबळ उपलब्ध करून घ्यावे किंवा त्याबाबतचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करावा.

उपरोक्त आदेशान्वये कामकाजास असणाऱ्या सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी आपल्या मूळ खात्यात / यापूर्वीचे कामकाजाकरिता रुजू व्हावयाचे असून संबंधित खातेप्रमुख यांचेमार्फत रुजू अहवाल सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करावयाचा आहे.

तरी संबंधीत खातेप्रमुख यांनी पुढील योग्यती तजवीज करावी.

Rubal

(रुबल अग्रवाल)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

प्रत -
१) मा. अतिरिक्त आयुक्त (ज/इ) यांना माहितीस्तव.
२) संबंधीत खातेप्रमुख, पुणे महानगरपालिका.